Exhibit - H




# इंदिरानगरचे पात्र झोपडीधारक अजूनही रस्त्यावरच

## घरे पाडून आठवडा उलटूनही पर्यायी घरांची प्रतीक्षा

प्राजक्ता कासले, मुंबई

तानसा जलवाहिनीलगत असलेल्या गरीबनगर व इंदिरानगरवरील घरे पाडण्याची धडक कारवाई करून पालिकेने वाहवा मिळवली असली तरी दुसरीकडे पात्र झोपडीधारकांना मात्र अजूनही घरे दिलेली नाहीत. या दोन्ही झोपडपट्ट्यांमध्ये सन २००० पूर्वीपासून राहणारेही रस्त्यावर आले असून आठवडा उलटूनही महानगरपालिकेचे अधिकारी त्यांना घराबाबत निश्चित तारीख सांगण्यास टाळाटाळ करत आहेत.

वांद्रे टर्मिनसजवळ तानसा जलवाहिनीवर इंदिरानगर वस्तीत तब्बल ७०० घरे होती. यातील २००० वर्षांपूर्वीपासून राहत असल्याचे पुरावे सादर करणाऱ्या १६३ झोपडीधारकांना एच पूर्व विभाग कार्यालयातून माहुल येथील घरांचे ताबापत्र गेल्या आठवड्यात देण्यात आले. सोमवारी, ६ नोव्हेंबर रोजी ताबापत्र दिल्यावर पालिकेने मंगळवारपासून कारवाई करत दोन दिवसांत झोपड्या भुईसपाट केल्या. एकीकडे वर्षानुवर्षे रखडलेली कायदेशीर कारवाई पूर्ण केल्याबद्दल पालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांचे कौतुक होत असले तरी गरीबनगरमधील ३५ तर इंदिरानगरमधील १६३ पात्र झोपडीधारकांना रस्त्यावर राहण्याची वेळ आली आहे. या वस्तीत २०हून अधिक वर्षे राहत असलेले मुख्तार शेख व त्यांचा मुलगा गेला आठवडाभर रोड पालिकेच्या एच पूर्व विभाग कार्यालयात जात आहेत. आठवडाभरापूर्वी ताबापत्र मिळाले असले तरी घराच्या किल्ल्या दिलेल्या नाहीत. शुक्रवारी नोटरी तसेच इतर काही कागदपत्रे मागण्यात आली. मात्र घर केव्हा मिळेल ते मात्र सांगत नाहीत, असे मुख्तार शेख म्हणाले.



इंदिरानगरआधी गरीबनगर पाडले. तेथील ३५ पात्र झोपडीधारकांपैकी १८ जणांना आज, सोमवारी घराच्या किल्ल्या दिल्या. आमचे घर केव्हा ताब्यात येईल, ते मात्र माहीत नाही, असे मुख्तार शेख यांच्या मुलाने सांगितले. हे सर्व कुटुंबीय सध्या वांद्रे टर्मिनसजवळच्या पुलाखाली राहत आहेत. याच वस्तीतील साजिद खानचे सात जणांचे कुटुंबीयही घरासाठी पात्र असूनही आठवडाभर पुलाखाली झोपत आहेत. 'आजही मी सांताक्रूझच्या वॉर्ड कार्यालयात तीन तास बसून आलो. त्यांनी सांगितल्याप्रमाणे १०० रुपयांचे सहा बॉण्ड पेपर दिले. घर देण्याची वेळ आली की सांगू, इथे बसून काही होणार नाही, असे पालिका अधिकारी सांगतात,' असे साजिद खान म्हणाले. त्यांच्यासोबतच या वस्तीतील इतर अपात्र झोपडीधारकही राहत आहेत. रेल्वेकडून सध्या कारवाई केली जात नसली तरी रस्त्यावर अनधिकृतपणे राहणाऱ्यांना रेल्वे पोलीस केव्हाही हाकलून देतील, अशी भीती या वस्तीतील रहिवाशांना आहे.

कायदेशीर कारवाई (पान ३वर)

NOTARY SHABBIR K. TAMBAWALLA AREA GREATER MUMBAI Regd. No. 6008 GOVT. OF INDIA

149

# इंदिरानगरचे पात्र झोपडीधारक अजूनही रस्त्यावरच

(पान १वरून) करण्यास आमचा विरोध नाही, मात्र कायद्यानुसार पात्र असूनही पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण होण्याआधीच पालिकेने वस्ती पाडण्यास सुरुवात केली. पात्र रहिवासीही गेला आठवडाभर रस्त्यावर राहत आहेत. याबाबत पालिकेकडे पाठपुरावा करूनही काहीही घडले नाही, असे या वस्तीत समाजसेवेचे काम करणारे नामदेव गुलदागड म्हणाले.

जलवाहिन्यालगतचा १० मीटर परिसर मोकळा करण्यासाठी १५ दिवसांपूर्वीपासून वांद्रे परिसरात कारवाई सुरू झाली. २६ ऑक्टोबर रोजी हार्बर रेल्वेलगतच्या गरीबनगरच्या वस्तीवर पालिकेने बुलडोझर फिरवण्यास सुरुवात केली होती. त्या वेळी स्थानिकांनी आग लावल्याने कारवाई थांबवावी लागली.

मात्र मंगळवारी, ३१ ऑक्टोबरपासून पालिकेने धडक कारवाई करत गुरुवारपर्यंत ८० टक्के जागा मोकळी केली. मात्र प्रत्यक्षात ४८ तासांची नोटीस देऊनही केवळ २४ तासांत कारवाई सुरू केल्याने तसेच पात्र झोपडीधारकांनाही पर्यायी घरे दिली नसल्याच्या कारणावरून उच्च न्यायालयाने या कारवाईला स्थगिती दिली.

मात्र इंदिरानगरमध्येही हीच स्थिती असून या परिसरातील पात्र झोपडीधारकांवरही रस्त्यावर राहण्याची पाळी आली आहे.

NOTARY
SHABBIR K. TAMBAWALLA
AREA GREATER MUMBAI
Regd. No. 6808
GOVT. OF INDIA

लोकमत

## वांद्रे पाइपलाइन : महापालिकेने निर्णय घेण्याची मागणी

# पात्रतेचे पुरावे असतानाही कुटुंबे घराच्या प्रतीक्षेत

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : वांद्रे (पूर्व) इंदिरानगर पाइपलाइनवर ३५-४० वर्षांपासून स्थित असलेल्या झोपड्यांवर करण्यात आलेल्या कारवाईला दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. मात्र आजही पात्रतेचे सर्व पुरावे असताना ही कुटुंबे २ वर्षांपासून उघड्यावर राहत आहेत. आरोग्याची कोणतीही सोय नसताना, सुरक्षा नसताना, मूलभूत सुविधा नसताना छोट्या मुलांचे भविष्य धोक्यात घालून गटाराच्या बाजूला राहणारी ही कुटुंबे हक्काचे घर मिळण्यासाठी न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.

परिणामी, महापालिकेने इंदिरानगर पाइपलाइनच्या रहिवाशांना न्याय देण्यासाठी प्रक्रिया हाती घ्यावी व लोकांचे लवकर पुनर्वसन करावे, असे म्हणणे मांडले जात आहे.

### महापालिकेविरुद्ध तक्रार

- युवा या सामाजिक संस्थेने महापालिकेविरुद्ध राज्य मानवी हक्क आयोगाकडे या प्रकरणी याचिका दाखल केली होती. राज्य मानवी हक्क आयोगाने तब्बल १९ महिन्यानंतर म्हणजेच १९ जुलै २०१९ रोजी सुनावणी घेण्यासाठी पालिका आणि युवा संस्था यांना बोलाविले होते.

येथील ७५० झोपड्यांना २८ ऑक्टोबर २०१७ रोजी मुंबई महापालिकेने अनधिकृत झोपड्या म्हणून निष्कासित करण्याची नोटीस दिली. या नोटिसीला १५ दिवस पूर्ण होत नाहीत तोपर्यंतच म्हणजे ७ नोव्हेंबर २०१७ रोजी इंदिरानगर पाइपलाइनवरील सर्व झोपड्या महापालिकेने निष्कासित केल्या होत्या. ७५० झोपड्यांपैकी केवळ १५५ झोपड्यांतील लोकांना प्रकल्पबाधित म्हणून पुनर्वसन मिळाले होते. उर्वरित इतर झोपड्यांतील लोकांना तात्पुरता निवाराही महानगरपालिकेकडून देण्यात आला नव्हता. त्यामुळे सर्व कुटुंबे रस्त्यावर, रेल्वेच्या ब्रिजखाली उघड्यावर राहत होती. महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात गदारोळ असल्याने २००० पूर्वीचे पात्रतेचे सर्व पुरावे असतानाही काही लोकांना पुनर्वसन मिळालेले नव्हते.

१४ ऑगस्ट २०१९ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये युवा संस्थेने पात्र २० कुटुंबांची एक नमुना यादी आयोगासमोर ठेवली. याचवेळी महापालिकेने असे नमूद केले की, पाइपलाइनच्या बाजूला ४३६ झोपड्या होत्या. त्यातील १५५ झोपड्यांना पुनर्वसन मिळाले आहे. २८१ झोपड्यांची कागदपत्रे अपील प्रकरण म्हणून आमच्याकडे आली आहेत. आणि त्यावर आम्ही का करीत आहोत.

१ नोव्हेंबर २०१९ रोजी राज मानवी हक्क आयोगात झालेल्‍ सुनावणीमध्ये युवा संस्थेने २ कुटुंबांची नमुना यादीतील नावे शोधृ काढली तर त्यातील १५ नावे परिशि दोनमध्ये अपात्र दाखविली आहेत. ‍ १५ कुटुंबांकडे पात्रतेचे सर्व पुरा असतानाही अपात्र दाखविली आहेत ही बाब युवाने ध्यान्यात आणून दिली तर महापालिकेने या कामास नवी आलेल्या सॅप पद्धतीनुसार किती वे लागेल हे सांगता येत नाही, असे नमू केले. यावर ३० नोव्हेंबर २०१९ रोज आयोगाने अंतिम आदेश दिला आहे या आदेशात येथील लोकां लवकरात लवकर पुनर्वसन करावे, अ नमूद केले आहे. एव्हाना त्यानंतरच्‍ पहिल्या तीन महिन्यांतच पुनर्वसना काम पूर्ण होणे अपेक्षित होते.

Hello Mumbai
Page No. 3 Sep 12, 2020
Powered by: erelego.com

NOTARY
GOVT

# इंदिरानगरमधील रहिवाशांवर रस्त्यावर राहण्याची वेळ

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : वांद्रे येथील इंदिरानगर वसाहतीतील रहिवाशांचे पुनर्वसन अडीच वर्षांपासून रखडल्याने त्यांना रस्त्यावर राहण्याची वेळ आली आहे. या रहिवाशांचे पुनर्वसन करण्याच्या सूचना राज्य मानवाधिकार आयोगाने देऊनही अद्यापही ते रखडले आहे.

इंदिरानगर येथील जलवाहिनीलगत असलेल्या झोपडपट्ट्यांवर पालिकेने नोव्हेंबर २०१७ मध्ये कारवाई केली होती. त्यानंतर १५५ झोपडपट्टीधारकच पात्र असल्याचे सांगत पालिकेने त्यांचे पुनर्वसन केले होते. मात्र त्याव्यतिरिक्त २८१ रहिवासी पात्र असूनही त्यांना घर नाकारण्यात आले होते. याबाबत युवा संस्थेच्या वतीने नामदेव गुलदगड यांनी राज्य मानवाधिकार आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. आयोगाने ३० नोव्हेंबर २०१९ ला त्याबाबत निकाल देत २८१ रहिवाशांचे तीन महिन्यात पुनर्वसन करावे, असे आदेश दिले होते. मात्र या रहिवाशांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित आहे. परिणामी या रहिवाशांवर उड्डाणपुलाखाली राहण्याची वेळ आली आहे.बिगारी काम करणारे गंगाराम हिवराळे मागील तीन वर्षांपासून पाल अंथरून झोपड्या पाडल्या तेथेच राहत आहेत. 'मागील चाळीस वर्षांपासून येथे राहतो. आता राहत असलेल्या पालाच्या घरात ना वीज आहे, ना पाणी आहे. घरात लहान मुले आहेत. मात्र या परिस्थितीत दिवस काढण्याशिवाय गत्यंतर नाही. सुमारे २०० कुटुंबे याच अवस्थेत राहत आहेत. पालिकेकडे अनेकदा मागणी करूनही हा प्रश्न तसाच आहे,' अशी व्यथा गंगाराम मांडतात. 'वसाहतीतील रहिवाशांकडे त्यांच्या वास्तव्याचे पुरावे होते. मात्र त्याची पडताळणी न करता पालिकेने त्यांना अनधिकृत ठरवून घराचा हक्क नाकारला. हे रहिवाशांवर अन्याय करणारे होते. राज्य मानवाधिकार आयोगाने याची दखल घेऊन घरे देण्याचा आदेश दिला आहे,' अशी माहिती युवा संस्थेचे वरिष्ठ प्रकल्प साहाय्यक नामदेव गुलदगड यांनी सांगितले.

## 'करोनामुळे पुनर्वसनास विलंब'

याबाबत पालिकेच्या एच पूर्व विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, 'पालिकेकडून रहिवाशांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया सुरू आहे. करोनाची परिस्थिती उद्भवल्यामुळे त्याला काहीसा विलंब झाला आहे. मात्र लवकरच या रहिवाशांना घरे उपलब्ध करून दिली जाणार आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

epaper.loksatta.com
लोकसत्ता Fri, 11 September 2020
https://epaper.loksatta.com/c/54862162

NOTARY
SHABBIR K. TAMBAWALLA
AREA GREATER MUMBAI
Regd. No. 6603
GOVT. OF INDIA

पुढारी

# महापालिकेने इंदिरानगर पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण करावी

मुंबई : प्रतिनिधी

राज्य मानवी हक्क आयोगाचे पालिकेला वांद्रा पूर्वेकडील इंदिरानगर पाईपलाईन पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. येत्या तीन महिन्यांत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश आयोगाने दिल्यामुळे येथील रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

वांद्रा पूर्वेकडील इंदिरानगर पाइपलाईन या ठिकाणी ७ नोव्हेंबर २०१७ मध्ये बी.एम.सी. कडून ७५० झोपड्यांची तोडमोड करण्यात आली होती. यापैकी पात्र झोपड्या म्हणून केवळ १५५ कुटुंबीयांना त्यावेळी माहुल या ठिकाणी पुनर्वसन देण्यात आले. या कुटुंबांना तात्पुरता निवारा देखील देण्यात न आल्याने इतर सर्व कुटुंबे त्यानंतर



राज्य मानवी हक्क आयोगाचे आदेश

रस्त्यावर आली होती. या कुटुंबातील महिला रस्त्यावर, ब्रीजखाली उघड्यावर राहत होत्या. लाईट नसल्याने महिला, मुलांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते.

या गोष्टीची दखल घेत युवा या सामाजिक संस्थेने १५ जानेवारी २०१८ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेविरुद्ध राज्य मानवी हक्क आयोगाकडे याचिका दाखल केली होती. राज्य मानवी हक्क आयोगापुढे युवा संस्थेने रहिवाशांची बाजू पुराव्याशी भक्कमपणे मांडली. युवा संस्थेने पात्र कुटुंबांची एक नमुना यादी आयोगासमोर ठेवली. त्यानंतर झालेल्या अंतिम सुनावणीत राज्य मानवी हक्क आयोगाने प्रकरण निकाली काढत सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या याचिकांचा संदर्भ देत सांगितले की, संविधानाच्या कलम २१ नुसार लोकांना जगण्याच्या अधिकाराखाली निवारा मिळण्याचा देखील अधिकार आहे. राज्य मानवी हक्क आयोगाने तीन महिन्यांच्या आत उर्वरित २८१ कुटुंबीयांचे पुनर्वसन करण्याचे आदेश महापालिकेला दिले आहेत.

My Mumbai Edition
21 Dec, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

NOTARY
GOVT. OF INDIA

पुढारी

# वांद्र्याच्या इंदिरानगरचे झोपडीधारक पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत

मुंबई : प्रतिनिधी

वांद्रा पुर्वेकडील इंदिरानगर पाईपलाईनवर असणारे १५५ झोपडीधारक दोन वर्ष पुनर्वसन न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. याबाबत राज्य मानवी हक्क आयोगात दाखल केलेल्या याचिकेवर ३० नोव्हेंबरला अंतिम सुनावणी होणार आहे. या सुनावणीकडे आता सर्व झोपडीधारकांचे लक्ष लागले आहे.

वांद्रा पुर्वेकडील इंदिरानगर पाईपलाईनवर ३५-४० वर्षापासून ७५० अनाधिकृत झोपडीधारक राहत होते. २८ ऑक्टोबर २०१७ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका एच (पूर्व) वार्डकडून या अनाधिकृत झोपड्या निष्कासित करण्याची नोटिस देण्यात आली. ७ नोव्हेंबर २०१७ रोजी इंदिरानगर पाईपलाईनवरिल सर्व झोपड्या मुंबई महानगरपालिकेने निष्कासित केल्या. ७५० झोपड्यांपैकी केवळ १५५ झोपड्यांतील लोकांना प्रकल्पबाधित म्हणून पुनर्वसन मिळाले. उर्वरित इतर झोपड्यांतील लोकांना तात्पुरता निवारा देखील महानगरपालिकेकडून देण्यात आला नाही. त्यामुळे सर्व कुटुंब रस्त्यावर व रेल्वेच्या ब्रिजखाली उघड्यावर राहत आहेत.

तसेच या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात उभा राहिला आहे. या झोपडीधारकांना वीज नसल्याने मुलांचा अभ्यास, व महिलांच्या सुरक्षेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच या नागरिकांना शौचालयाची देखील सोय नसल्याने पैसे देऊन रेल्वेचे शौचालय वापरावे लागत आहे. या नागरिकांचे संसार गेले कित्येक महिन्यापासून उघड्यावर आले आहेत. महानगरपालिकेने केलेल्या सर्वेक्षणात गदारोळ असल्याने २००० पूर्वीचे रहिवाशी पात्रतेचे पुरावे असतानाही लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे पुनर्वसन मिळत नाही.

७ नोव्हेंबर २०१९ रोजी या निष्कासनाला दोन वर्ष पूर्ण झाले. ज्यांचे पात्रतेचे पुरावे आहेत त्यांची पात्रता निश्चित करून त्यांना लवकरात लवकर हक्काचे पुनर्वसन द्यावे अशी मागणी वारंवार लोकप्रतिनिधींना वेळोवेळी करण्यात आली.

मात्र सर्व लोकप्रतिनिधींनी याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले. त्यानंतर या झोपडीधारकांना न्याय मिळावा म्हणून युवा सामाजिक संस्थेच्या वतीने नामदेव गुलदगड यांनी राज्य मानवी हक्क आयोगात १५ जानेवारी २०१८ रोजी एक याचिका दाखल केली होती. या याचिकेवर झालेल्या तीन सुनावणीनंतर आता ३० नोव्हेंबरला अंतिम सुनावणी होणार आहे. या सुनावणीकडे सर्व झोपडीधारकांचे लक्ष लागले आहे.

My Mumbai Edition
11 Nov, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

NOTARY

पुढारी

# वांद्र्यातील इंदिरानगर पाईपलाईनचे रहिवासी उघड्यावर

## महापालिकेने जमीनदोस्त केलेल्या ४३६ पैकी केवळ १५५ झोपडीधारकांचे पुनर्वसन


मालाड/मुंबई : पुढारी वृत्तसेवा

इंदिरानगर पाईपलाईन, वांद्रा (पूर्व) येथील ४३६ झोपड्यांवर पाच वर्षांपूर्वी कारवाई करण्यात आली. त्यापैकी केवळ १५५ पात्र झोपडीधारकांचेच पुनर्वसन झाल्याने उर्वरित सर्व कुटुंबे उघड्यावर आहेत. संबंधित कुटुंबे सोमवारच्या वादळातही उघड्यावर होती. पावसाळ्याचे पुढील ४ महिनेही त्यांना असेच काढावे लागणार आहे.

७ नोव्हेंबर २०१७ रोजी मुंबई महापालिकेने वांद्र्याच्या इंदिरानगर पाईपलाईन येथील ४३६ झोपड्या कारवाई करून पाडल्या. यापैकी पात्र झोपड्या म्हणून केवळ १५५ कुटुंबांना त्यावेळी माहुल गाव येथे हलवण्यात आले. उर्वरित २८१ झोपड्यांची कागदपत्रे अपील प्रकरण म्हणून पालिकेकडे अद्याप प्रलंबित असल्याने उर्वरित २८१ कुटुंबीयांना घरे मिळणार की नाही? कधी मिळणार? अशी कोणतीही माहिती पालिका गेल्या चार वर्षांपासून देत नाही.

रहिवाश्यांना हक्काचा निवारा मिळत नाही, महिलांना सुरक्षितता नाही, मूलभूत सुविधांची उपलब्धता नाही, मुलांना शाळेत जाता येत नाही म्हणून जानेवारी २०१८ मध्ये युवा संस्थेने राज्य मानवी हक्क आयोगात दाखल केलेल्या याचिकेवर ३० नोव्हेंबर २०१९ रोजी झालेल्या अंतिम सुनावणीत राज्य मानवी हक्क आयोगाने प्रकरण निकाली काढत सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या याचिकांचा संदर्भ देत सांगितले की, संविधानाच्या कलम २१ नुसार लोकांना जगण्याचा अधिकार आहे आणि जगण्याच्या अधिकाराखाली त्यांना निवारा मिळण्याचा देखील अधिकार आहे. तो अधिकार त्यांना मिळायला हवा अशी ठोस भूमिका मांडत राज्य मानवी हक्क आयोगाने तीन महिन्यांच्या आत उर्वरित २८१ कुटुंबीयांचे पुनर्वसन करण्याचे आदेश पालिकेला दिले.

राज्य मानवी हक्क आयोगाच्या आदेशाने लोकांना मोठा दिलासा मिळाला. परंतु, पालिकेने राज्य मानवी हक्क आयोगाच्या आदेशाचे उल्लंघन करून अद्यापही रहिवाशांचे पुनर्वसन केले नाही.



● गेल्या चार वर्षांपासून युवा संस्थेच्या सहकार्याने आमचा पुनर्वसनाबाबत लढा सुरू आहे. बीएमसी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद देत नसल्याने आम्हाला अतिशय वाईट जीवन जगावे लागत आहे. आमच्या अन्न, वस्त्र, निवारा आणि आरोग्य व शिक्षण या मूलभूत गरजाही पूर्ण होत नाहीत, अशी हतबलता येथील रहिवासी गंगाराम हिवराळे यांनी व्यक्त केली.

तौक्ते चक्रीवादळात सोमवारी इंदिरानगर पाईपलाईनवरील रहिवाशांच्या घरांवरील छपरे उडून गेली. काही झोपड्यांमध्ये पाणी शिरले. पाण्यामुळे घरांची कागदपत्रे देखील भिजून गेली. छोटी मुले, महिला, वृद्ध भर पावसात आणि वादळात उपाशी पोटी रस्त्यावर आली. वांद्रा टर्मिनसच्या ब्रिजखाली बसून या रहिवाशांनी संपूर्ण रात्र काढली. युवा संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने त्यांची रात्रीच्या जेवणाची सोय करण्यात आली. या कुटुंबांच्या निवाऱ्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा.

नामदेव गुलदगड,
वरिष्ठ प्रकल्प सहाय्यक, युवा संस्था

आमच्या पातळीवर कागदोपत्री पडताळणी झाली आहे. कागदपत्रे पुढील कारवाईसाठी वरिष्ठांकडे पाठवले आहेत.


प्रशांत पाटील,
उप अभियंता, एच पूर्व वॉर्ड

My Mumbai Edition
May 19, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

NOTARY
SHABBIR K. TAMBAWALLA
AREA GREATER MUMBAI
Regd. No. 6808
GOVT. INDIA

लोकमत

# चक्रीवादळामुळे घरांची छपरे उडून गेली; रहिवासी वादळात-भर पावसात उघड्यावर



लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : सोमवारी (दि. १७) पडलेल्या चक्रीवादळाच्या पावसाने वांद्रे येथील इंदिरानगर पाईपलाईनवरील नागरिकांच्या घरांची छपरे वाऱ्याने उडून गेली. काही कुटुंबीयांच्या घरांत पाणी घुसले. पाण्यामुळे घराची कागदपत्रेदेखील भिजून गेली. छोटी मुले, महिला, वृद्ध लोक भर पावसात आणि वादळात उपाशीपोटी रस्त्यावर आले. वांद्रे टर्मिनसच्या पुलाखाली बसून या नागरिकांना संपूर्ण रात्र उजाडावी लागली. युवा संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने त्यांची रात्रीच्या जेवणाची सोय करण्यात आली, अशी माहिती युवा संस्थेचे वरिष्ठ प्रकल्प साहाय्यक नामदेव गुळदगड यांनी दिली.

इंदिरानगर पाईपलाईन, वांद्रे (पूर्व) या ठिकाणी ७ नोव्हेंबर २०१७ रोजी महापालिकेकडून ४३६ झोपड्यांची तोडमोड करण्यात आली होती. पात्र झोपड्या म्हणून केवळ १५५ कुटुंबीयांना त्यावेळी माहुल गाव या ठिकाणी पुनर्वसन दिले होते. पाईपलाईनच्या बाजूला ४३६ झोपड्या होत्या. त्यांतील १५५ झोपड्यांना पुनर्वसन मिळाले आहे. उर्वरित २८१ झोपड्यांची कागदपत्रे अपील प्रकरण म्हणून महापालिकेकडे चार वर्षांपासून पडलेली आहेत. या २८१ कुटुंबीयांना घरे मिळणार की नाही? कधी मिळणार? अशी कोणत्याच स्वरूपाची माहिती महापालिका चार वर्षांपासून देत नाही. जानेवारी २०१८ साली युवा संस्थेने राज्य मानवी हक्क आयोगात दाखल केलेल्या याचिकेवर ३० नोव्हेंबर २०१९ रोजी झालेल्या अंतिम सुनावणीत राज्य मानवी हक्क आयोगाने प्रकरण निकाली काढले. राज्य मानवी हक्क आयोगाने तीन महिन्यांच्या आत उर्वरित २८१ कुटुंबीयांचे पुनर्वसन करण्याचे आदेश महापालिकेला दिले. मात्र आजपर्यंत पुनर्वसन झालेले नाही.

दरम्यान, वांद्रे पूर्व सरकारी वसाहतीत विजयनगर म्हाडा वसाहतीलगत साईकृपा रहिवासी संघ ही मोठी वस्ती आहे. सोमवारी संध्याकाळी मुसळधार पाऊस आणि वाऱ्यामुळे वस्तीत अनेकांच्या घरी पाणी तुंबले होते. अशात संध्याकाळी साडेचारच्या सुमारास जवळील विजयनगर या म्हाडा वसाहतीच्या कंपाऊंडमध्ये असलेले एक मोठे झाड येथील पाच घरांवर आणि साईमंदिराच्या मंडपावर कोसळले. यात मोठी वित्तहानी झाली आहे.

Hello Mumbai
Page No. 1 May 19, 2021
Powered by: erelego.com

NOTARY
SHABBIR K. TAMPAWALLA
AREA GREATER MUMBAI
Regd. No. 8603
GOVT. OF INDIA